**<u>रे.दि.मु.क्र.११०/२००९ मधील निशाणी ११२ वरील आदेश</u>**

सदरहू अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ सहवाचन आदेश ६ नियम १७ अन्वये मयत वादीचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत व त्यानुसार दाव्यात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरचा दावा मालकी जाहीर होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये वादी शंकर विष्णू शिंदे मयत झाले असून त्यांचे वारस दाव्याचे कामी अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. सदर दुरूस्तीमुळे मूळ दाव्यामध्ये कोणताही बदल होत नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादींचे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सदरहू अर्जातील कारण संयुक्तीक नाही. वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास जाणीव पूर्वक विलंब केल आहे. करीता, त्यांनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली. विकल्पेकरून, अर्ज मंजूर करणेचा झालेस रू. ५०००/– चे खर्चावर मंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादी शंकर विष्णू शिंदे हे दि.०८/०९/२०२३ रोजी मयत झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्रावरून दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज दि.२५/०१/२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. वादीचा अबेटमेंटचा आदेश रद्द करण्याबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. दावा पुढे चालविण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. दाव्याचे सरनाम्यात वादी कोणत्याही नवीन अनुतोषाची मागणी करीत नाही. त्यामुळे, सदर दुरूस्तीने दाव्याच्या मूळ स्वरूपात कोणताच बदल होत नाही. त्यामुळे, प्रतिवादींचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही. सबब, खालील आदेश.

**<u>– : आ दे श :–</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ११२) रक्कम रुपये २००/– चा खर्च वादीने प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. सदरचा खर्च हा पुढील तारखेपर्यंत देण्याचे आहे.

२) मयत वादीचे वारसांना दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत समाविष्ठ करावे

३) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती १४ दिवसांच्या आत करून घ्याव्यात व सोबत दुरूस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Digitally signed by PRASAD SHANKARRAO GIRGAONKAR
Date: 2024.04.25 17:06:39 +0530

पाटण ( प्र.शं. गिरगांवकर )

दि.२५/०४/२०२४. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.